शासन मान्य
प्रयत्न आमचे, विश्वास तुमचा...
दारू सोडवा
हमखास!
सिगारेट / गुटखा / गांजा / मावा सोडवा
(न सांगता किंवा सांगून सोडवा)
जनसेवा व्यसनमुक्ती केंद्र
डॉ.विलास पाठक : 8308113114, 9422240654
वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
पत्ता: शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर अलीपुर रोड बार्शी

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
दीपावलीच्या तमाम जनतेस हार्दिक शुभेच्छा !

लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ९८ वा | सोमवार, दि. ११ नोव्हेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आरक्षणाला विरोध करणाऱ्याला पाडा

## फडणवीसांनी मराठा समाजास जाणीवपूर्वक टार्गेट केलं



**जालना (वृत्तसेवा):-** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या एका आंदोलनात लाठीचार्ज झाल्यापासून त्यांनी गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांवर शाब्दीक हल्ला करायला सूरूवात केली. त्यामुळे सतत जरांगेंच्या टार्गेटवर देवेंद्र फडणवीस राहिले आहेत. पण विधानसभा निवडणुकीत माघार घेतल्यानंतर जरांगे फडणवीसांना टार्गेट करणं बंद करतील, असे बोलले जात होते.

मात्र आता जरांगेंनी पुन्हा टार्गेटवर घेतलं आहे. तुम्ही अमुक दिलं तमुक दिलं या गुर्मीत राहु नका. पठ्या इथे उभा आहे, तुम्हाला गुडघ्यावरच टेकवणार. तुम्हाला आता सोडतच नाही, असा इशारा जरांगे पाटलांनी देवेंद्र फडणवीसांना दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आज अंतरवाली सराटीत पत्रकार परिषद घेऊन विधानसभा निवडणुकीवर भुमिका मांडली. यावेळी जरांगेंनी फडणवीसांना देखील टार्गेटवर घेतलं. 40-40 वर्ष काम करणाऱ्या नेत्यांनी आरक्षणासाठी प्रयत्न केला,आता जनता त्यांचा विचार करेल असे विधान फडणवीसांनी केल्याचं पत्रकारांनी जरांगेंना विचारलं. यावर जरांगे म्हणाले, आरक्षणासाठी रस्त्यावर उतरलेल्या महिलांचा तुम्ही अपमान केला आहे. तुम्ही कितीही रस्त्यावर उतरा आणि आंदोलन करा, मी नाही देत आरक्षण तुम्हाला,अशी भूमिका फडणवीस व त्यांच्या टोळीची असल्याचे जरांगे यांनी सांगितले. तसेच 40 वर्ष त्यांनी नाही दिलं अशा गप्पा फडणवीस मारतात. त्यांनी नाही दिलं म्हणून तुम्हाला निवडून दिलं होत ना. पण तुम्ही शेतकऱ्यांचा एक प्रश्न मार्गी नाही लावला. ना कर्जमाफी केली आणि ना एक रूपयात पीक विमा भरला म्हणून थापच मारतात. अमुक केलं, तमुक केलं, अशा थाप मारायच्या पलिकडे काय दिलं. त्या गुर्मीत नाही राहायच. सरकार कुणाचंही येऊ दे. हा पठ्ठ्या उभा आहे. तुम्हाला गुडघ्यावर टेकवणारच, तुम्हाला सोडणार नाही,असा इशारा जरांगेंनी दिला.

मनोज जरांगे पुढे म्हणाले, मी स्पष्ट सांगूनही देखील अनेकांमध्ये संभ्रम आहे. मतदानाचा सन्मान तुमच्या हातात आहे. त्यामुळे कुणाला पाडायचे त्याला पाडा, ज्याने आपल्यावर अन्याय केला. ज्याने आपल्या आया-बहीणींची डोकी फोडली. आपल्याच समाजातील तरुणांवर खोटे गुन्हे दाखल केले त्याला सोडू नका असे आवाहन जरांगे पाटलांनी केले. तसेच मतदान कुणाला करायचे, कुणाला पाडायचे आणि कुणाकडून बॉण्ड आणि व्हिडिओ घ्यायचा ते आता स्वतः मराठा समाजाने ठरवावे. तुम्हाला कोण मदत करेल? कोण आपल्या आरक्षणासाठी काम करेल? अशा लोकांच्या पाठीशी राहावे आणि हा निर्णय स्वतः समाजाने ठरवावे, असे जरांगे यांनी सांगितलंय. राजकारणाच्या तयारी पेक्षा फुकट कुणाला मोठे करण्या पेक्षा आंदोलनाच्या तयारीला लागू. प्रचार सभेला प्रचाराला जाऊ नका.पण मतदान मात्र सर्वांनी करावे. ज्याला जे करायचे ते करा पण आरक्षणासाठी ज्याने त्रास दिला त्याला सोडायचे नाही, आता पूर्ण कारभार मराठा समाजाच्या हातात दिला आहे,असे देखील जरांगेंनी सांगितले.

## विरोधकांचं घाणेरडे राजकारण उद्याच्या मतदानातून जनता नक्कीच संपवेल

### आ. यशवंत माने यांच्या प्रचार सभेत राजन पाटील यांचा घणाघात



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** राजकारण हे राजकारणाच्या पद्धतीनं केलं पाहिजे. राजकारणामध्ये मतभेद असू शकतात मात्र मनभेद नसतात. महायुतीच्या माध्यमातून माझे विरोधक राहिलेले आज एका स्टेजवर आहेत. राजकारणामध्ये तात्विक वाद असला पाहिजे. मात्र तालुक्यामध्ये उमेदवार व पाटील हे राजकारण बिघडवण्याचं काम न करत आहेत. माजी व माज्या र मुलांची बदनामी करण्याचं न कृत्य या लोकांकडून होत आहे.मात्र, अशा काही कृत्यामुळे जनतेमध्ये आपुलकी मिळेल हा खोटा आशावाद आहे. आणि विरोधकांचं असं हे घाणेरडे राजकारण उद्याच्या मतदानातून जनता नक्कीच संपवेल, असा घणाघात माजी आमदार राजन पाटील यांनी केला.

मोहोळ विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार यशवंत माने यांच्या प्रचारार्थ ढोकबाभूळगाव, सय्यद वरवडे, कातेवाडी, परमेश्वर पिंपरी येथे आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उमेदवार आ. यशवंत माने, धनगर समाजाचे जेष्ठ नेते यशवंत नरोटे, रामभाऊ खांडेकर, जालिंदर लांडे उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ.माने म्हणाले की, मोहोळ तालुक्यातील दक्षिण भागात या पाच वर्षात विकासाचा अनुशेष भरून काढला आहे. प्रत्येक गावामध्ये कोट्यवधींचा निधी दिला आहे. त्यामुळे आता देखील पुन्हा एकदा 'वेळ नवी घड्याळ तेच' या समीकरणातून मला पुन्हा एकदा या मतदारसंघात काम करण्याची संधी द्या. राज्यात देखील महायुतीचे सरकार येणार आहे. येणाऱ्या पाच वर्षात यापेक्षाही जास्तीचा निधी देऊन मतदारसंघाचा कायापालट केल्याशिवाय स्वस्थ बसणार नसल्याचे वचन त्यांनी यावेळी दिले.

यावेळी भाऊसाहेब तरंगे, वसुदेव जाधव, माणिक पाटील, दादा करणावर, दादा पवार, राहुल मोरे, विकास वाघमारे, भारत जाधव, माऊली जाधव, अशोक अवताडे, तानाजी क्षिरसागर, दीपक क्षिरसागर, राम क्षिरसागर, सरपंच भरत क्षिरसागर, महेश पवार, नवनाथ अवताडे, पराग पाटील, हरीभाऊ चौगुलेंसह ढोकबाभूळगाव, सय्यद वरवडे व कातेवाडी येथील ग्रामस्थ व महायुतीचे सर्व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवाजी सावंतांचा रणजितसिंह शिंदेंना पाठिंबा

**माढा (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील माढा मतदारसंघात महायुतीमध्ये बेबनाव झाला असून शिवसेनेने महायुतीचा धर्म न निभावता अपक्ष उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला आहे. आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे बंधू शिवाजी सावंत यांनी आमदार बबनराव शिंदे यांचे चिरंजीव, अपक्ष उमेदवार रणजितसिंह शिंदेंना पाठिंबा दिला आहे, त्यामुळे माढ्यात महायुतीमध्ये बिघाडी झाल्याचे मानले जात आहे.

माढा विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील, महायुतीकडून माढ्याच्या नगराध्यक्षा मीनल साठे, तर रणजितसिंह शिंदे हे अपक्ष निवडणूक लढवत आहेत. याव्यतिरिक्त इतरही उमेदवार रिंगणात आहेत. मात्र, या तिघांमध्ये मुख्य लढत आहे.

शिवसेनेचे संपर्कप्रमुख शिवाजी सावंत आणि आमदार बबनराव शिंदे यांच्यामध्ये माढा तालुक्यातील आलेगाव येथील भैरवनाथ शुगर कारखान्यावर बैठक झाली. त्या बैठकीनंतर शिवाजी सावंत यांनी रणजितसिंह बबनराव शिंदे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. वास्तविक, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या कुटुंबीयांकडून महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार होणे अपेक्षित असताना त्यांनी आमदार बबनराव शिंदे यांच्या मुलाला पाठिंबा जाहीर केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

माढा तालुक्यातील सावंत आणि शिंदे हे एकमेकांचे राजकीय प्रतिस्पर्धी असणारी घराणी आहेत. अनेक निवडणुका त्यांनी एकमेकांच्या विरोधात लढवल्या आहेत, त्यामुळे सावंत आणि शिंदे युतीचे माढा तालुक्यात नवल आहे.

दरम्यान, शिवाजी सावंत हे महायुतीकडून माढ्यातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक होते. मात्र, ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुटल्याने अजित पवार यांनी माढ्याच्या नगराध्यक्षा मीनल साठे यांना उमेदवारी जाहीर केले आहे, त्यामुळे नाराज झालेल्या सावंत गटाने गेल्या आठवड्यात वाकाव येथे विचारविनिमय मेळावा घेतला होता. त्या मेळाव्यात त्यांनी कोणाला पाठिंबा द्यायचा याचा निर्णय लवकरच घेण्यात येईल, असे जाहीर केले होते, त्यानुसार सावंत यांनी बबनराव शिंदे यांच्याशी जुळवून घेत त्यांच्या मुलाला पाठिंबा जाहीर केला आहे.



**निवडून येणाऱ्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचा निर्णय : शिवाजी सावंत**

याबाबत शिवाजी सावंत म्हणाले, सर्व कार्यकर्त्यांशी विचारविनिमय करून आम्ही अपक्ष उमेदवार रणजितसिंह बबनराव शिंदे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. जो उमेदवार निवडून येईल, त्यालाच पाठिंबा द्यायचा, असं आमचं ठरलं होतं, त्यानुसार रणजित शिंदे यांना पाठिंबा देत असल्याचे सावंत यांनी जाहीर केले.

**शिंदे-सावंतांमध्ये राजकीय संघर्ष नव्हता : बबनराव शिंदे**

सावंत आणि शिंदे कुटुंबीयांमध्ये कधीही राजकीय संघर्ष नव्हता. आम्ही 2009 मध्ये एकत्र काम केले आहे आणि यापुढेही एकत्र काम करण्याचे आमचे ठरले आहे, त्यामुळे रणजित शिंदे यांचा विजय नक्की आहे. आम्हाला विजयाचा विश्वास होता. आता त्यात सावंतांच्या पाठिंब्याची भर पडली आहे, असे आमदार बबनराव शिंदे यांनी सांगितले.

## बीआरएसचे पदाधिकारी महेश कोठेंच्या पाठीशी



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव (केसीआर) यांच्या नेतृत्वाखालील भारत राष्ट्र समितीच्या (बीआरएस) सोलापूर शहरातील पदाधिकार्यांनी शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार, माजी महापौर महेश कोठे यांच्या पाठीशी राहण्याचा निर्णय घेतला असून उद्यापासून (सोमवारी) सर्व पदाधिकारी प्रत्यक्ष प्रचारात सक्रीय सहभाग नोंदविणार असल्याची घोषणा बीआरएसचे शहराध्यक्ष दशरथ गोप व पक्षाचे ज्येष्ठ नेते नागेश वल्याळ यांनी पत्रकार परिषदेत केली. भारत राष्ट्र समिती पक्षाच्या पदाधिकार्यांनी रविवारी पत्रकार परिषद घेऊन पक्षाची भूमिका जाहीर केली. भारत राष्ट्र समिती पक्षाचे उमेदवार महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात नसल्याने सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात समविचारी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबरोबर राहण्याचा निर्णय घेतला आणि याची माहिती पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनाही दिली. त्यांच्याकडून होकार आल्यानंतर स्थानिक पातळीवर आम्ही आमची भूमिका जाहीर करून महेश कोठे यांना पाठिंबा दिला असल्याचे गोप यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस जयंत होले-पाटील, संदीप वल्याळ, व्यंकटेश आकेन, श्रीधर चिट्याल उपस्थित होते.

**सत्ताधारी आमदार निष्क्रिय**

सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील सत्ताधारी भाजपच्या निष्क्रिय आमदाराने सोलापूर शहराला विकासात मागे नेले. मतदारसंघ व शहराच्या विकासासाठी त्यांनी काहीच केले नाही. त्यामुळेच आम्ही विकासाची धमक असलेल्या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार महेश कोठे यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असून या निवडणुकीत आम्ही महेश कोठेंची ताकद बनून काम करणार आहोत, असेही भारत राष्ट्र समितीचे शहराध्यक्ष दशरथ गोप व नागेश वल्याळ यांनी सांगितले. दरम्यान, आगामी महापालिकेत बीआरएस स्वबळावर लढणार असल्याचा नाराही या नेत्यांनी दिला.

## कस्तुरबा गांधी झोपडपट्टीचा प्रश्न मार्गी लावणार - नरसय्या आडम

### मसिहा चौक येथे माकपच्या प्रचारार्थ जाहीर सभा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मोदी परिसरातील कस्तुरबा गांधी झोपडपट्टीवासीयांच्या त्यांच्या हक्काच्या घरांच्या सातबाऱ्याचा प्रश्न प्रलंबित आहे. मी आमदार झाल्यास सहा महिन्यात हा प्रश्न मार्गी लावणार, असे आश्वासन माकपचे माजी आमदार तथा शहर मध्य मतदारसंघातील माकपचे उमेदवार नरसय्या आडम यांनी दिले.शहर मध्य मतदार संघातील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या प्रचारार्थ मोदी येथील मसिहा चौक येथे आयोजित सभेत ते बोलत होते. (पान 2 वर..)

## तुमच्या-माझ्या स्वाभिमानाची लढाई - काडादी

### ■ प्रज्ञावंतांच्या सहविचार सभेत विजयाचा निर्धार



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर दक्षिण विधानसभेची निवडणूक ही तुमच्या-माज्या स्वाभिमानाची लढाई आहे. हा स्वाभिमान जपण्यासाठी ही लढाई आपल्याला जिंकावीच लागेल, असा निर्धार या मतदारसंघातील अपक्ष उमेदवार धर्मराज काडादी यांनी व्यक्त केला.

रविवारी, जुळे सोलापुरातील गोविंदश्री मंगल कार्यालयात आयोजित प्रज्ञावंतांच्या सहविचार सभेत ते बोलत होते. सोलापूर विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. इरेश स्वामी, ॲड. रा. गो. म्हेत्रस, स्वामी समर्थ सूत गिरणीचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे, काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब शेळके, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे माजी संचालक सुरेश हसापुरे, श्री सिध्देश्वर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते, माजी नगरसेवक शिवलिंग कांबळे, उद्योजक रवी आडगी, माजी प्राचार्य के. एम. जमादार यावेळी उपस्थित होते. अनेकांनी आपल्या भाषणातून काडादी यांना निवडून आणण्याचे आवाहन केले.

धर्मराज काडादी यांनी आपल्या भाषणातून सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील अनेक प्रश्नांची उकल केली. राज्यातील नाकर्ते सरकार आणि इथले निष्क्रिय आमदार यांच्यामुळेच हे प्रश्न सुटले नाहीत असेही ते म्हणाले. गेली दहा वर्षे लोकांनी ज्या अपेक्षेने भाजपला निवडून दिले, त्या अपेक्षा पूर्ण करण्यात आमदारांना अपयश आले आहे. विकासाची कामे करण्याऐवजी त्यांनी सुडाचे राजकारण केले. व्यक्तिद्वेष करण्यातच आपली शक्ती वापरली. त्यामुळे मतदारसंघातील एकही प्रश्न सुटला नाही. विकासाची दृष्टी नसलेल्या अहंकारी आमदाराला आता घरी बसवण्याची वेळ आली आहे. येत्या 20 नोव्हेंबरला हे कर्तव्य पार पाडा, असे आवाहन त्यांनी केले.

सोलापूर दक्षिण मतदारसंघातील विकासाची पूर्वपीठिका सांगताना काडादी म्हणाले, कर्मयोगी अप्पासाहेब काडादी, वि. गु. शिवदारे, आनंदराव देवकते, बाबूराव चाकोते, कमळे गुरुजी, ब्रह्मदेव माने यांनी सार्वजनिक संस्था उभ्या केल्या. यामुळे दक्षिण सोलापूरचा विकास झाला. सिध्देश्वर परिवाराच्या माध्यमातून या संस्था पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहे. सिध्देश्वर कारखान्याचे आज तीस हजार सभासद आहेत. इथेनॉल, सहवीजनिर्मिती प्रकल्प उभे केले. गाळप क्षमता प्रतिदिन तीन हजारांवरुन दहा हजार केली. 38 मेगावॉट सहवीजनिर्मितीचा प्रकल्प केला. यामुळे कारखान्याचे उत्पन्न वाढले. गेली तीन वर्षे इतरांच्या तुलनेत प्रतिटन चारशे रुपये जास्त दर दिला. यामुळे शेतकर्यांमध्ये विश्वास निर्माण झाला. (पान 2 वर..)

**हद्दवाढ भागात यात्रिक निवास उभारू**

शहरी भागात नागरी सुविधा नाहीत. पाणी, रस्ते, ड्रेनेज, हॉस्पिटल याची गरज आहेच परंतु पर्यटकांसाठी सुविधा निर्माण केल्या तर त्याचा फायदा होईल. गाणगापूर, पंढरपूर, अक्कलकोट, तुळजापूर या तीर्थक्षेत्रांना हजारो भाविक जातात. त्यांच्यासाठी हद्दवाढ भागात यात्रिक निवास उभारता येईल. पंचतारांकित हॉटेल, क्रीडांगण, मनोरंजनाचे केंद्र याची गरज आहे. हद्दवाढ भागात जागेचे व्यवहार होत नाहीत. तो प्रश्न सोडवला पाहिजे. बससेवा, एसटी स्थानक, रेल्वे स्थानक यांचीही गरज आहे. रोजगारासाठी स्थलांतरित होर्णाया इथल्या तरुणांना रोखून त्यांच्या हाताला काम देण्यासाठी चांगले उद्योग आणले पाहिजेत, असेही काडादी आपल्या भाषणात म्हणाले.

स्थापना १९६७ | शासनमान्य | नोंदणी क्र.इ.३५९ (सोलापूर)

### सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ

हुतात्मा स्मारक,मार्कंडेय उद्यान,अशोक चौक पोलीस चौकी समोर,सोलापूर-४१३००५.

**वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

**(फक्त सभासदांकरीता)**

सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या सर्व सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ०८/१२/२०२४ रोजी दुपारी ३.०० वा. संघाचे नवीन कार्यालय यशदा अभ्यासिका (११७ उमानागरी,सोलापूर) येथे आयोजित करण्यात येत आहे. सभेस सर्वांनी उपस्थित रहावे. ही विनंती.

सभेपुढील विषय:- १) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२३ - २४ चा ऑडिट मेमो व जमाखर्च मंजूरीसाठी.
३) सन २०२३ - २४ चा वार्षिक अहवाल मंजूरीसाठी.
४) सन २०२४ - २५ साठी ऑडिटरची नेमणूक करणेबाबत.
५) सन २०२५ - २६ चे अंदाजपत्रक मंजुरीसाठी.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय.

**टिप :-** कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच विषयासाठी सभा भरेल यावेळी कोरमची आवश्यकता भासणार नाही.

सही (कार्यवाह) — **साहेबराव शिंदे**
सही (अध्यक्ष) — **विजयकुमार पवार**

## संपादकीय

# भोवळ येणार

महाराष्ट्राची यंदाची विधानसभा निवडणूक भोवळ आणणार आहे. मतदानाला जेमतेम 12 दिवस राहिले आहेत, मात्र केवळ मतदारच नाहीत तर निवडणूक लढणारे आणि लढवणारे सगळेच गोंधळात आहेत. पूर्वी मतपत्रिकेवर चार फारतर पाच उमेदवारांची नावे असायची. नंतर ईव्हीएम आले. तेथेही एका मतदारसंघात जास्तीत जास्त 8 ते 10 उमेदवार असायचे. प्रमुख पक्षांच्या उमेदवारांपाशी मतदार थांबायचे आणि एकाला मत देऊन मोकळे व्हायचे. आता सरासरी 14 उमेदवार प्रत्येक मतदारसंघात असल्याचे सांगितले गेले आहे.

त्यात चिन्हांचा गेल्या वर्षभरापासून सुरू झालेला घोळ आहेच, त्यातही एकाच पक्षात आणि एकाच घरात वषार्नुवर्षे एकत्र राहिलेले आता परस्परांच्या विरोधात उभे आहेत. ते जसे परस्परांना परके नाहीत तसेच मतदारांनाही परके नाहीत. मात्र, आपण नेमके कोणाला मत देतो आहोत आणि का देत आहोत किंवा देणार आहोत यामुळे महाराष्ट्रातील मतदार चक्रावला आहे. त्याहीपुढे निवडणुकीनंतर आणखी मोठे बदल घडतील अशीही वाच्यता आहे. म्हणजे नेमके काय होणार आहे? आता एकत्र लढर्णाया मित्रांची अदलाबदली घडणार आहे? की सिक्कीमप्रमाणे विरोधी पक्षच राहणार नाही? हा सगळा प्रकारच भोवळ आणणारा आहे. त्यात राज्य कोणत्या दिशेने जाणार याचा अदमास लागेनासा झाला आहे.

महाराष्ट्र देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे हे खरे आहे. उद्योग, शिक्षण, आरोग्य, महसूल, करदाते अशा सगळ्यांच बाबींत वर आहे. केवळ विरोधक ते मानत नाहीत. अर्थात, ते सत्तेवर आल्यावर त्यांचाही हाच दावा आणि आकडेवारी असते जी आताचे सत्ताधारी देत असतात; पण विरोधात असताना या गोष्टी मान्य केल्या तर विरोध कशाचा करणार या न्यायाने ते टीका करत असतात. महाराष्ट्राच्या या विशेष स्थानामुळे दिल्लीचा अथवा त्या त्या वेळेच्या दिल्लीश्वरांचा महाराष्ट्रावर डोळा राहिला आहे. प्रगत राज्य आपल्याकडे असावे असे सगळ्यांना वाटते. तथापि, आताच्या निवडणुकीत महाराष्ट्रातील राजकारण खरेच आपल्या प्रगत राज्य या लौकिकाचा वारसा सांगते आहे असे दिसत नाही. पक्षांच्या विचारधारांशी बांधिलकी राखत येथे निवडणुका लढल्या गेल्या आणि मतदारांनीही कौल दिला.

साधारण अर्धे शतक येथे प्रगतीशील आणि सर्वसमावेशक विचारांचे सरकार राहिले आणि त्यामुळेच राज्य पुढे गेले. चालू दशकात किंबहुना गेल्या पाच-सात वर्षांत मती कुंठित करर्णाया घटना घडल्या. पुरोगामी विचारधारेचा अभिमान मिळवणारी मंडळी अचानक ज्यांना जातीवादी किंवा प्रतिगामी म्हणून हिणवत होती त्यांच्या मांडवात जाऊन बसली. तद्वतच धर्माच्या नावाने आणाभाका घेणारे आणि आपली कट्टरता अलंकारासारखी सांभाळणारे अचानक सर्वसमावेशकतेची प्रौढी सांगर्णायांच्या गोटात जाऊन बसले. विशेष म्हणजे ही जी अदलाबदली झाली ती दोन्ही बाजूंनी मनापासून स्वीकारली आणि अगदी सहजपणे नवे मित्र एकरूप झाले. मग प्रश्न असा येतो की इतकी वर्षे परस्परांना पुरोगामी आणि प्रतिगामी म्हणून तुटून पडर्णायांत जर एवढेच सख्य होते तर अगोदरच सगळ्यांनी एकत्र यायला हवे होते.

आता जातनिहाय जनगणनेचा मुद्दाही सगळ्यांच्या हाताशी आहे. लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर समोर आलेला हा विषय अजूनही थंड झालेला नाही. आता जनगणना केली जाण्याचे सूतोवाच करण्यात आले असले, तरी जातगणना होणार का याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. मात्र, महाराष्ट्राच्या निवडणुकीत जात फॅक्टर अचानक स्ट्राँग झाला आहे. त्याअनुरूप उमेदवारांच्या निवडी करण्यात आल्या आहेत. काही ठिकाणी प्रबळ इच्छुक असूनही केवळ जातीत बसत नसल्यामुळे त्याला डावलून आपल्याकडचा प्रबळ आणि हवा त्या जातीचा उमेदवार मित्रपक्षाला निर्यात करून त्याची उमेदवारी जाहीर केली गेली आहे. प्रत्येक मतदारसंघांमध्ये दोन प्रमुख आघाड्यांचे अधिकृत उमेदवार, त्या आघाड्यांमधील मित्रपक्षांचे असंतुष्ट उमेदवार, ज्यांना लढायचेच आहे असे अपक्ष आणि आपणच निवडून येणार कारण जात हा फॅक्टर आपला मजबूत आहे असे मानणारे अन्य प्रबळ अशी उमेदवारांची भाऊगर्दी झालेली पाहायला मिळते आहे.

उमेदवारीच्या माघारीच्या दिवशी सगळ्या बंडखोरांचे बंड थंड होईल असा आव आणला गेला तरी प्रत्यक्षात तसे झाले नाही. त्याचे कारण आमदार होण्याची क्षमता असलेले किंवा पूर्वी आमदारकी भूषवली आहे मात्र नव्या मित्रांमुळे बिर्चायांना आपल्याच मतदारसंघात सतरंज्या उचलण्याची वेळ आली आहे असे उमेदवार रिंगणात कायम आहेत. सत्ताधारी आघाडीचे 18 तर विरोधी आघाडीतील 22 उमेदवारांना शांत करण्यात अपयश आले आहे. मात्र हे खरेच अपयश आहे की त्यांना लढण्याची मूकसंमती दिली गेली आहे हेही गौडबंगाल आहे. कारण बंडखोरांना उभे राहण्यात दिली गेलेली रसद ही दुर्सया आणि अखेरच्या अंकाची पूर्वतयारी आहे.

निकालाच्या दिवशी कोणत्या एका आघाडीला स्पष्ट जनादेश मिळाला तर आणि त्यांची एकत्र राहण्याची तयारी असेल तर ठीक, अन्यथा आपण बाजू बदलून पलीकडे गेलो आणि त्यांचे गणित जुळत असेल तर तिकडे जाण्याचा पर्यायही खुला ठेवला गेला आहे. त्या दृष्टिकोनातूनही ही प्रबळ बंडखोर मंडळी सत्ता सिंहासनापर्यंत पोहोचवण्यात उपयुक्तच ठरणार आहे. किंबहुना त्यांनी त्याचवेळी पडद्यामागून समोर यावे अशी रचना केली गेली आहे. आज दोन आघाड्या परस्परांशी लढत आहेत आणि त्यातील एका आघाडीचे सरकार येईल असे दिसते तसे नाही.

पान १ वरून

## कस्तुरबा गांधी झोपडपट्टीचा...

अध्यक्षस्थानी बेंजामिन बलगेरी होते. यावेळी व्यासपीठावर माकपचे जिल्हा सचिव एम.एच. शेख, माजी नगरसेविका कामिनी आडम, युसुफ शेख,शंकर म्हेत्रे, रेनगर फेडरेशनच्या अध्यक्षा नलिनी कलबुर्गी, अमित मंचले, मुकरी सालार, दिनेश घोडके, मनोहर गायकवाड, शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे अतिष मेट्रे, आदींची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी आडम पुढे म्हणाले की, मोदी परिसरातील जगजीवनराम झोपडपट्टी, कस्तुरबा गांधी झोपडपट्टी, चिंतलवार वस्ती अशा अनेक झोपडपट्ट्यांशी माझा जुना संबंध आहे. मी आमदार झाल्यास येथील झोपडपट्टीवासीयांना केंद्र-राज्य सरकारचे पाच लाख रुपये अनुदान मिळवून देऊन पक्की घरे बांधून देण्यास कटीबद्ध आहे. मोदी परिसराचा कायापालट केल्याशिवाय मी राहणार नाही.

यात्रसंगी एम. एच. शेख म्हणाले की, देशात 2014 सालापासून मोदी सरकार आल्यापासून जातीय तेढ, विद्वेष पसरविण्याचे काम सुरू आहे. सार्वजनिक उद्योगधंद्यांचे खाजगीकरण करण्याचा सपाटा सुरु आहे. या माध्यमातून मित्र

### आता नरसय्या आडम माजी नव्हे भावी आमदार

यात्रसंगी माजी नगरसेविका कामिनी आडम म्हणाल्या की, नरसय्या आडम यांना माजी आमदार असे संबोधले समजले जाते. या निवडणुकीतील जनतेचा प्रतिसाद पाहता आता ते भावी आमदार होतील, अशी जनतेला आहे. विडी-यंत्रमाग कामगार, रिक्षाचालक, भाजीपाला विक्रेते यांना न्याय देण्याचे काम नरसय्या आडम यांनी केले. गरिबांविषयी प्रचंड कळवळा असणाऱ्या आडम यांनी आमदार नसतानादेखील 41 हजार घरे बांधून घेण्याचे काम केले, हे लक्षात घेता त्यांना पुन्हा निवडून देण्याची गरज आहे.

भांडवलदारांचे हित जोपासण्याचा तसेच गरिबांना कंगाल करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. सोलापुरात स्मार्ट सिटीच्या नावाखाली 1100 कोटींचा निधी आला पण त्यातील 11 कोटी रुपयांचा गरीब वर्गाच्या भागातील विकासासाठी वापर झाला नाही, ही दुर्दैवी बाब आहे.

यात्रसंगी मनोहर गायकवाड म्हणाले की, कामगारांचे दुःख, व्यथा जाणून घेणारे नेतृत्व म्हणून नरसय्या अडम यांच्याकडे पाहिले जाते. जेव्हा जेव्हा कामगारविरोधी धोरणे आली, त्यावेळी त्याला विरोध करून कामगारांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न त्यांनी केला. विडी कामगारांना हक्काचे घर मिळवून देण्याचे काम त्यांनी केले. अशा नेतृत्वाला पुन्हा आमदार करण्याची गरज आहे.

यात्रसंगी अतिष मेट्रे हणाले की, रे नगर घरकुल उभारणीचे श्रेय हे संपूर्णपणे आडम मास्तर यांचे आहे, असे असताना हे श्रेय लाटण्याचे काम भाजपकडून होत आहे. तेव्हा या निवडणुकीत त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याची आता वेळ आली आहे.

या सभेच्या आधी प्रजा नाट्य मंडळातर्फे क्रांतिकारी गीते सादर करण्यात आली. प्रास्ताविक ॲडव्होकेट अनिल वासम यांनी केले. आभार अमित मंचले यांनी मानले. सभेला परिसरातील नागरिक व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभा यशस्वी करण्यासाठी सुरेश फरड,सुनील काडे, हेबेल जगले,अजय भंडारी, सिमोन पोगुल, अक्षय भंडारी, रवी भंडारे, जेम्स तीपलदिंनी, सनी भंडारे यांनी परिश्रम घेतले.

## तुमच्या-माझ्या स्वाभिमानाची लढाई ...

महाराष्ट्रातील आदर्श कारखाना म्हणून 'सिध्देश्वर'ने लौकिक प्राप्त केला. सिध्देश्वर देवस्थानच्यावतीने अनेक लोकोपयोगी कामे केली. महिलांसाठी स्वतंत्र पॉलिटेक्निक तसेच इंजिनीअरिंग कॉलेज काढले आणि उत्तम चालू आहे. भक्तनिवास, सुवर्णसिध्देश्वर, दासोह, फिजिओ थेरपी सेंटर, हॉस्पिटल अशा संस्था वटवृक्षाप्रमाणे वाढल्या आहेत. सर्वांच्या सहकायार्तून हे शक्य झाले, अशी कृतज्ञतेची भावना काडादी यांनी व्यक्त केली.

या मतदारसंघात ग्रामीण आणि शहरी भागाचा समावेश होतो. दोन्हीकडच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. गेली दहा वर्षे आमदारांनी फक्त आश्वासने दिली. प्रत्यक्षात काहीच केले नाही. शेतकर्यांचा पाण्याचा आणि विजेचा प्रश्न आहे. सिंचनाचा प्रश्न सुटला तर दक्षिण तालुक्यात हरित क्रांती होईल. शेतीमालावर आधारित उद्योग आणले तर रोजगाराचा प्रश्न दूर होईल, असेही ते म्हणाले.

सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी केवळ द्वेष आणि स्वाथापीटी पाडली. स्वतःचा कारखाना चालावा यासाठी सिध्देश्वर कारखाना बंद पाडण्याचा कुटील डाव होता. विमानसेवेचे नाव पुढे करुन चिमणी पाडली. वर्ष उलटून गेले तरी विमानसेवा सुरु झाली नाही. 2007 मध्ये तत्कालीन शासनाने होटगी विमानतळाच्या जागेवर आयटी पार्क उभारण्याचा निर्णय घेतला होता. बोरामणी येथे मोठे विमानतळ सुरु करण्याची योजना आखली. त्यासाठी कोट्यवधी रुपये मंजूर केले. सरकार बदलल्यानंतर याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले, असेही ते म्हणाले.

विजापूर, गुलबर्गा यासारख्या शहरात रिंगरोड झाले पण सोलापुरात ते करता आले नाही. विकासाचे हे सर्व प्रश्न मार्गी लावण्याऐवजी स्वार्थी राजकारण करणारे भाजप सरकार आणि त्या पक्षाचे आमदार यांनी दक्षिण सोलापूरला विकासापासून दूर नेले आहे. या मतदारसंघातील अधोगतीमुळे निर्माण झालेले चित्र बदलायचे आहे. त्यासाठी आपण मला संधी दिली तर पुढच्या पाच वर्षांत नक्की चित्र बदललेले दिसेल, असा विश्वास काडादी यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना डॉ. इरेश स्वामी म्हणाले, दक्षिण सोलापूरला फार मोठी राजकीय परंपरा लाभली आहे. लोकांनी आग्रह केल्यामुळे धर्मराज काडादी यांनी निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. ते सुसंस्कृत, अभ्यासू उमेदवार आहेत. या मतदारसंघाचे नेतृत्व करण्यास ते सक्षम आहेत. कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्यानंतर त्यांना ही संधी मिळणार आहे. मतदारांनी अन्य विचार करुन मत वाया घालवण्यापेक्षा काडादी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन स्वामी यांनी केले.

ॲड. रा. गो. म्हेत्रस म्हणाले, पन्नास वर्षांपूर्वी कर्मयोगी अप्पासाहेब काडादी खासदार, आमदार होते. आता धर्मराज काडादी यांना निवडून देण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. संविधान वाचवण्यासाठी हे करणे गरजेचे आहे. भाजप सगळ्या स्वायत्त संस्था ताब्यात घेऊन घाणेरडे राजकारण करत आहे. ते रोखले पाहिजे.

कामगार नेते गोवर्धन सुंचू म्हणाले, धूम्रपान कायद्यामुळे विडी उद्योग संकटात आहे. यंत्रमाग कामगारांचे प्रश्न आहेत. भाजप सरकारचे धोरण कामगार विरोधी आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत धर्मराज काडादी निवडून येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

के. एम. जमादार म्हणाले, जे काम शिवदारे, देवकते, कमळे गुरुजींनी केले तेच काम धर्मराज काडादी करीत आहेत. दक्षिणच्या विकासासाठी त्यांना विधानसभेवर पाठवणे आपले कर्तव्य आहे.

रवी आडगी म्हणाले, दक्षिणमध्ये बदल घडवायचा आहे, हीच मानसिकता ठेवा. मतदान केंद्रांवर गेल्यानंतर नाव आणि चिन्ह यांचा गोंधळ होतो. त्यामुळे लोकांपर्यंत चिन्ह पोहोचवा. दक्षिण तालुक्यात चांगले उद्योग आणता येतात. त्यासाठी दृष्टी असलेला आमदार हवा. धर्मराज काडादी यांच्याकडे नेतृत्व गुण आहेत. आपण त्यांच्या पाठीशी राहिले पाहिजे.

शंकर पाटील म्हणाले, कर्मयोगी अप्पासाहेबांनी विकासाची खूप कामे केली. तोच वारसा घेऊन निघालेले धर्मराज काडादी यांना संधी दिली पाहिजे. ज्यांना राज्यघटना मान्य नाही अशांना बाजूला करण्याची वेळ आली आहे. देशात मोदींची अघोषित आणीबाणी आहे. समाजवाद त्यांना नष्ट करायचा आहे. अशावेळी काडादी यांच्यासारखी चांगली माणसे निवडून दिली पाहिजेत.

प्रा. नीलिमा माळगे यांनी आपल्या भाषणात धर्मराज काडादी यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गुणगौरव केला. ते दूरदृष्टीचे आहेत. त्यांचा विचार समतावादी आहे. स्वच्छ व्यक्तिमत्त्व, मृदुभाषी आणि दुर्सयाबद्दल आदरभाव बाळगणारे आहेत. ते निवडून येणे ही काळाची गरज आहे, असेही त्या म्हणाल्या.

शिवा बाटलीवाला म्हणाले, निवडणूक अवघड असली तरी जिंकण्याची पध्दत सोपी आहे. प्रत्येकाने आपल्या घराशेजारच्या चार घरात सांगून जरी मते मिळवली तरी काडादी सहज निवडून येतील. प्रा. शहाबुद्दीन शेख, विजय शाबादी यांनीही काडादी यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून रात्रीचा दिवस करुन निवडून आणू अशी ग्वाही दिली.

प्रारंभी प्रा. अशोक निंबर्गी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी धर्मराज काडादी यांची भूमिका स्पष्ट केली. सध्याचे राजकीय वातावरण आणि भाजप आमदारांची कार्यपध्दती यावर जोरदार टीका केली. सूत्रसंचालन प्रा. संतोष पवार यांनी केले तर ॲड. शिवशंकर घोडके यांनी आभार मानले. यावेळी भीमाशंकर जमादार, अख्तरताज पाटील, बसवराज शास्त्री, बाळासाहेब पाटील आदी उपस्थित होते.

## प्रबोधन

# वर्षाची बेगमी। करी शेतकरी

कवितेचा जन्म कसा होतो, हे सांगताना हिंदी कवी सुमित्रानंदन पंत यांनी लिहिलंय, वियोगी होगा पहला कवी। आह से उपजा होगा गान। उमडकर आँखो से चुपचाप। वही होगी कविता अनजान ॥ अर्थात, मनुष्य दुःखाने आधी व्याकुळ होतो, दुःखदर्शी अरेरे, हायहाय, असे अव्यय शब्द तो उच्चारतो, त्याचे डोळे अश्रू गाळू लागतात, आणि ह्या नीरव अश्रूधारेला रसिक लोक कविता असं नाव देतात. कवी केशवसुतसुद्धा जो दुःखाचे कडवट घोट पितो, तो कवी, असंच म्हटलं आहे. ते म्हणतात, आमुचा पेला दुःखाचा। डोळे मिटूनी प्यायाचा॥ महाकाव्य रामायण हेसुद्धा वाल्मिकींच्या व्याकुळपणातूनच जन्मलं, असं एका अनुष्टुभ छंदातून कळतं. एका क्रौंच पक्षाच्या जोडप्यातील नराचा शिकाऱ्याच्या बाणाने वेध घेतला, तेव्हा मादीपक्षिणीने केलेला आक्रोश वाल्मिकीच्या सुप्त कविमनाला मुळापासून हादरवून गेला आणि त्यांच्या समर्थ प्रतिभेचा अंतस्थ प्रवाह रामकथेला जन्म देऊन गेला. एका इंग्रजी कवीनेसुद्धा काव्य हे दुःखजन्य असतं, असंच म्हटलं असून तेच श्रेष्ठ, प्रिय साहित्य असे उद्गार काढताना म्हटलं आहे, 'Our sweetest songs are those that tell of saddest thoughts.' असं जरी असलं तरी, सर्व साहित्य हे दुःखोद्भवच असतं, असं मात्र नव्हे. पाश्चात्त्यांनी दुःखात नाटकं श्रेष्ठ मानली असतील, पण संस्कृत नाटककारांनी नाटक हे सुखान्तच असलं पाहिजे, असा दंडक घालून दिला होता. भारतीय माणूस मुळातून सुखवादीच आहे. म्हणून थोर जीवनवादी तत्त्वज्ञ चावार्कांनी जगताहात तोवर आनंदाने जगा, असा आदेश देऊन त्यांचा सुखवाद पुष्ट केला होता. हा आनंदवादी संप्रदाय जन्म दुःखं, जरा दुःखं, व्याधि दुःखं पुनःपुनः। संसारसागरे दुःखं तस्मात जाग्रहि जाग्रहि। अर्थात, 'मनुष्याला जन्मभर दुःख सहन करावंच लागतं, म्हातारपणाचं दुःख तर आणखीच त्रस्त करणारं, त्यातून नाना व्याधी दुःखदायकच असतात म्हणून जागे व्हा,' असा आद्य शंकराचार्यांनी उपदेश केला. पण संदेश आणि दुःखवाद बाजूला ठेवून आपण दसरा साजरा करतो, दिवाळीचा दीर्घोत्सवी आनंद घेतो आणि सुखाची देव-घेव करतो. भारताइतके सण जगात कुठेही नाहीत, हे सुखवादाचं लक्षण म्हणायला हवं. मोसमी पाऊस संपता संपता आमची ग्रामवासी घरं नव्या धान्याच्या नव्या जीवनदायी सुगंधाने ओसंडू लागतात. अनेक शतकं उलटली, पण दरवर्षीचा हा नियम बदललेला नाही. विसाव्या शतकात विद्याप्रसाराने दिवाळीचा आनंद वाढवणाऱ्या साहित्य सुगीची आता त्यात भर पडली आहे. रंगीत मुखपृष्ठांचे दिवाळी अंक म्हणजे मराठी भाषेचा बौद्धिक, मानसिक, हर्षोल्लासपूर्ण आनंदोत्सवच! दिवाळीच्या लाडू-करंज्या आणि खमंग फराळपेक्षा रसिक वाचकांनी दिवाळी अंकातील मसालेदार कथा, कविता, विनोद यांच्यावर प्रथम पसंतीची मोहोर आधी उमटवली आहे. मराठी मनं साहित्याचा आस्वाद मनमुराद लुटू लागतात. दिवाळी अंकांनी शिक्षित-अर्ध शिक्षितांमध्ये साहित्यप्रेम रुजवून मराठी वाचनसंस्कृती समर्थ करण्याचं जे कार्य केलं आहे, ते अद्वितीय आणि प्रशंसापात्र आहे. भाषेच्या प्रसाराची, विकासाची चिंता करणाऱ्या जगातील सर्वांसाठी मराठी भाषेतील दिवाळी अंक हा एक उत्कृष्ट वस्तुपाठ आहे, म्हणूनच तो आणखी फोफावणं, वाढणं विकसित होणं अत्यावश्यक आहे.

दिवाळी अंकांनी जसे वाचक घडवले, तसे प्रतिभावंतही घडवलेत. कोणकोणत्या साहित्यकारांच्या लेखनाचा प्रारंभ दिवाळी अंकापासून झाला, याचा शोध हा लेखनकार्यशाळेच्या उपयोगाचा विषय होऊ शकतो. तरीही दिवाळी अंकांच्या साहित्य- निर्मितीची अवहेलना करण्यासाठी त्यांना कुत्र्याच्या छत्र्या असे निंदाव्यंजक शब्द टवाळखोर वापरीत असतात. दिवाळी अंकातील साहित्य हलकंफुलकं, विनोदी, मिस्कीलपणा, गप्पा-थट्टा अशा अंगाने जावं हा अलिखित संकेत रूढ झाला आहे, त्याला लेखक-कवी, संपादक काय करणार? नाही तरी, बुद्धिजड, तात्त्विक, मेंदूला थकवा आणणारं साहित्य हौस-मौजमजेच्या काळात कोण वाचणार? दोन घटका गमतीने घालवता आल्या की बस्स.

दिवाळी अंक संग्राह्य असावा, हे कुणी नाकारणार नाही. पण त्यासाठी दीडशे पानांच्या अंकात पन्नास पानं राशीफल देणं म्हणजे भाषा आणि साहित्य यांची फसवणूक आहे. दिवाळीचा !फराळया शीर्षकाने खमंग विनोद, मजेदार चित्रं, समाजकारण-राजकारणावर हास्याचे फवारे उडवले जाणं अपेक्षित असताना कोथिंबिरीच्या वड्या आणि दुधीभोपळ्याची खीर कशी करावी, हे सांगणं हा दिवाळी अंकांची चेष्टा केल्यासारखा प्रकार होईल. त्याऐवजी साहित्य विश्वातील चुटके, गमती, देशी-विदेशी कवी-लेखकांची मजेशीर व्यक्तिचित्रं अंकाची संग्राह्यता वाढवतील. दिवाळी अंक थोर समीक्षकांच्या दृष्टीने आजही उपेक्षित आहेत, वाङ्मयाच्या इतिहासात त्यांची एका ओळीने तरी दखल घेतली जाणं आवश्यक आहे. त्यांना न्याय मिळो हीच सदिच्छा! त्यासाठी-

आली दीपावली। दसरा संपता
सजली स्वागता । घरेदारे ॥ १
आनंद दाटला । मनामनातून
मळभ पळून । दूर गेले ॥२
वषार्ची बेगमी । करी शेतकरी
दाटे तृप्त घरी। समाधान ॥ ३
प्रेमाच्या सोन्याची । झाली देवघेव
रंक आणि राव। एक झाले ॥४
साहित्यिक घेती । दिवाळीची भेट
साहित्याची वाट । चालूनिया ॥५
वाचनप्रेमींना। मेजवानी मिळे
दार उघडले। आनंदाचे ॥६
साहित्यभांडार । समृद्ध होतसे
बहरा येतसे । शब्दकळा ॥७
साहित्य सुगीने। मने तृप्त झाली
दिवाळी हसली । कौतुकाने ॥ ८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# मोदीमुळे नारायण पाटील यांना उमेदवारी मिळाली आहे- जयंत पाटील



**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अजित पवारांचा ७० हजार कोटींचा घोटाळा बाबत भाष्य करताच चौथ्या दिवशी हे सर्व भाजपसोबत गेले हे सर्व तिकडं गेल्यामुळे नरेंद्र मोदी मुळेच करमाळा विधानसभेसाठी नारायण पाटील यांना उमेदवारी मिळाली असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशअध्यक्ष जयंत पाटील यांनी बोलताना सांगितले. रोपळे (क) ता माढा येथे महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण पाटील यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रदेशअध्यक्ष जयंत पाटील यांची जाहिर सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते बोलत होते.

जयंत पाटील पुढे म्हणाले की दिवाळीमध्ये महागाई वाढल्यामुळे सर्वसामान्य लोकांना दिवाळी करता आली नाही. याचबरोबर शेतीमालाचे भाव दिला नाही. फडणवीस हे सोयाबीनला ६ हजार रुपये भाव देतो म्हणाले होते आज तो भाव ३ हजार रुपयांवर आला आहे. कापूस आयात केला, कांदा निर्यात बंदी केली, याचीही शिक्षा भाजपला लोकसभेच्या वेळेस मतदारांनी दिले आहे. याचबरोबर साखरेचे दर कमी केल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही दर मिळत नाही. सर्व वस्तूंचे जीएसटी दर लावण्यात आले आहेत. या सरकारने अंत्यविधी च्या साहित्यांवर जी. एस. टी. लावली आहे. गरिबांसाठी २८ ते १६ टक्के जीएसटी व श्रीमंतासाठी ५ टक्के जीएसटी द्यावा लागत आहे.

महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला गेले त्यामुळे तरुणांना नोकऱ्या मिळत नाहीत. मोदी महाराष्ट्राला मोठा उद्योग देतो म्हटले होते. मात्र अद्याप एकही प्रकल्प महाराष्ट्राला दिला गेला नाही. या महाराष्ट्र राज्यातील सत्ताधारी त्रिकूट मोदी शहा यांना घाबरत आहेत. त्यामुळे उद्योग सर्व गुजरातला जात आहेत. ई. डी. सी. बी. आय प्रकरण लावल्यामुळे भाजप सोबत गेलो असल्याचे भुजबळ यांनी स्वतः सांगितले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जे आश्वासन दिले होते. या कामांचा ना चा पाढा सांगितला तर जनतेला त्रास कसा होईल ही कामे जयंत पाटील यांनी सांगितली. याचबरोबर सर्वसामान्य नागरिकांना पाच लाख रुपयाचा आरोग्य विमा योजना सुरू असल्याचेही सांगितले होते मात्र एकालाही मोठ्या शहरांमध्ये हॉस्पिटलमध्ये पाच लाख रुपयांचा मोफत उपचार मिळाले नाहीत.

महाविकास आघाडीचे सत्ता येतात पाच पंचसूत्री कार्यक्रम आखण्यात येणार आहेत यामध्ये प्रामुख्याने महिलांना दर महिन्याला तीन हजार रुपये, महिलांसाठी एसटी प्रवास मोफत, प्रत्येक कुटुंबांना २५ लाख रुपयाचा आरोग्य विमा, तीन लाखाची शेतकऱ्यांची कर्जमाफी सत्तेत वर येताच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतील. जातनिहाय जनगणना करू याचा जाहीरनामा लवकरच प्रसिद्ध केला जाणार आहे.

कुर्डू येथील बेंद ओढ्यात पाणी सोडण्यासाठी शरदचंद्र पवार यांच्याबरोबर बैठक घेऊन त्वरित पाणी सोडण्यात येईल. यासाठी लागेल ती किंमत मोजण्यास तयार आहेत. या सत्ताधाऱ्यांनी काय दिवे लावलेत हे सर्वांना माहीतच आहे.

आमचं घड्याळ चोरी गेला आहे. सध्या घड्याळ चिन्ह असलेल्यांना घड्याळ हे न्यायप्रविष्ठ असल्याचे लिहावे लागत आहे. बरं झाले करमाळा मतदारसंघात कोण घटाळ्याचे चिन्हचा उमेदवार नाही. अजित पवार व एकनाथ शिंदे यांना भाजप वापरून घेत आहेत. एकनाथ शिंदेचे उमेदवाराला भाजपाचा पाठिंबा नाही अशी परिस्थिती आहे असल्याचे सत्ताधाऱ्यांवर जयंत पाटील यांनी आरोप केले.

अपक्षाला कोणतीही किंमत नसते अपक्ष कधीही कुठेही जाऊ शकतो असे म्हणत त्यांनी महाविकास आघाडीची सत्ता येणार असल्याचे ठणकावून सांगितले. यावेळी संजय पाटील घाटणेकर, हनुमान खताळ, योगेश जाधव, शशिकांत माळी, हर्षल वाघमारे, दत्ता गवळी, नागेश पाटील, संतोष वारे, पवन पाटील, फिरोज खान, आनंद गोडसे, राहुल काटे आधी उपस्थित होते.

### वात्रटिका

**सभा आणि गर्दी**

व्यासपीठावर रोज
पिपाण्या वाजू लागल्या...
माईक पुढं नेत्यांच्या
सभा गाजू लागल्या...
व्यासपीठाच्या पुढं गर्दी
असू नसू तुम्ही बोला...
सभा ऐकण्यापेक्षा
व्हिडिओत गुंग असतो चेला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# आरक्षण वाचवायचे असेल तर 'वंचित' शिवाय पर्याय नाही - प्रकाश आंबेडकर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आरक्षण हा व्यवस्थेचा हिस्सा आहे. संविधानातून आरक्षण काढून घेतले तर संविधानाला अर्थ राहणार नाही. समाजातील अधिकार आणि स्वाभिमान संपणार आहे. एससी, एसटी आणि ओबीसी या घटकांनी आरक्षण वाचविण्यासाठी एकत्र आले पाहिजे. आरक्षण वाचवायचे असेल तर वंचित बहुजन आघाडी शिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी केले. सोलापूर विधानसभा मतदारसंघातील वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सोलापुरात पहिली सभा झाली. यावेळी ते बोलत होते.

**आरक्षण काढून घेतले तर संविधानाला अर्थ राहणार नाही : आंबेडकर**

एससीमध्ये वर्गीकरण झाले तर अंतर्गत आरक्षण राहणार आहे. मात्र क्रिमिलियरमुळे एकदा आरक्षण घेतले की, पुन्हा घेता येणार नाही. तुम्हाला बाहेर काढले जाईल. आरक्षणाच्या माध्यमातून शिडी कायम राहणार आहे. हृदय काढून घेतले तर माणूस जिवंत राहत नाही, तसे संविधानातून आरक्षण काढून घेतले तर संविधानाला अर्थ राहणार नाही. संविधान आणि लोकशाही हा मागील लोकसभेचा मुद्दा होता. आता आरक्षण हा मुद्दा ऐरणीवर आहे. ओबीसी आरक्षण काढून घेण्याची परिस्थिती निर्माण केली जात आहे. ओबीसींना किती जागा दिल्या याचा जाब ओबीसी वगार्ने आता महायुती व महाविकास आघाडीला विचारला पाहिजे.

ओबीसीचे आरक्षण घालवण्याचे राजकारण सुरू आहे.



भाजपाने 'बटेंगे तो कंटेंगे' अशी नवी घोषणा दिली आहे. ओबीसी आरक्षणाला विरोध का? असा प्रति प्रश्न ओबीसीने विचारला पाहिजे. उद्याच्या विधानसभा निवडणुकीनंतर ओबीसीच्या आरक्षणाला धोका आहे. झेडपी, महापालिका, ग्रामपंचायत, अशा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षण नाही. ओबीसी आरक्षण गेले तर सवर्ण हिंदूंनीच ते कापले असे होईल. तो मुसलमान नसेल तर सवर्ण हिंदूच राहणार आहे. ओबीसी आरक्षण काढण्यासाठी हा खेळखंडोबा सुरू असल्याचा आरोप ही यावेळी ॲड. आंबेडकर यांनी केला. व्यवस्था बदलण्यासाठी वंचित बहुजन आघाडीला मतदान करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर, सोलापूर जिल्हा प्रभारी प्रा. सोमनाथ साळुंखे, शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, उमेदवार संतोष पवार, श्रीनिवास संगेपाग, संतोषकुमार इंगळे, राज कुमार, विक्रांत गायकवाड, धनंजय जगदाळे, अशोक माने, राहुल चव्हाण उपस्थित होते. यांच्यासह प्रिया पवार, अनिरुद्ध वाघमारे, महासचिव विनोद इंगळे, आतिष बनसोडे आदींसह पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष मडीखांबे यांनी केले तर सूत्रसंचालन अनिरुद्ध वाघमारे यांनी केले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# माढ्यासह राज्यात परिवर्तन अटळ-अभिजीत पाटील

## तुळशीत वर्षाच्या आत पाणी, तालुक्यातील सर्व रस्ते दोन वर्षात पक्के करणार

**लऊळ (कटूसत्य वृत्त):-** तीस वर्षे आमदारकी असतानाही तुळशी सारख्या गावात आजही पिण्याचे पाणी नाही,येथील मुलांची लग्ने जमत नाहीत. त्यामुळे पुढील एक वर्षाच्या आत तुळशीला पाणी तर आणुच पण दोन वर्षात मतदारसंघातील सर्व रस्ते पक्के करू, असे आश्वासन महाविकास आघाडीचे उमेदवार अभिजीत पाटील यांनी दिले.

तुळशी (ता.माढा) येथे आयोजीत प्रचार सभेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष्याचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, हभप मधुकर नाईकनवरे, भारत पाटील, विजय भगत, सूरज देशमुख, दादासाहेब नाईक, शिवाजी मोरे, नागेश दगडे, बापूसाहेब दगडे, नारायण माळी, विशाल व्हनमाने, नामदेव खांडेकर, मोहित मोरे, मनोज शहा, बापूसाहेब गव्हाणे, विनायक वसेकर, संदीप कुलकर्णी, प्रमोद गव्हाणे,आदी उपस्थित होते. यावेळी पाटील यांनी स्वतःच्या कामाचा अनुभव सांगताना बंद पडलेला विठ्ठल सहकारी साखर कारखाना ताब्यात घेऊन चालू करून दाखवला. एवढेच नाही तर शेतकऱ्यांच्या उसाला जादा दर देण्यास सर्वांना भाग पाडले. त

यातून एकाच हंगामात तब्बल साडेआठशे कोटी रुपये ज्यादा शेतकऱ्यांना मिळवून दिले. हे आपण शेतकऱ्यांचे दुःख जाणत असल्याने करू शकलो, असे सांगितले.

आजपर्यंत जे-जे बोललो ते खरे करून दाखवले आहे. विरोधकांनी मात्र आधी शरद पवार साहेबांना धोका दिला आणि आता ऐन निवडणुकीत अजित दादांना धोका दिला आहे. त्यामुळे विकासकामांसाठी एकदा संधी द्या आणि 'आमदाराच्या पोरालाच पुन्हा आमदार करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या पोराला आमदार करा' असे आवाहन त्यांनी केले.

सलग तीस वर्षे आमदारकी ताब्यात असतानाही यावेळी पक्षाने तिकीट का दिले नाही याचा विरोधकांनी आणि मतदारांनी विचार करावा असे सांगून आपल्याला शरद पवार साहेबांनी तिकीट दिले, आता जनता आमदार करणार असा विश्वास अभिजीत पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

परिवर्तनासाठी शरद पवार साहेब आख्खा महाराष्ट्र पिंजून काढत आहेत.

महायुतीचे शासन राज्यात आणि केंद्रात सत्तेत असतानाही आरक्षणाचा प्रश्न जाणून बुजून चिघळत ठेवल्याचे श्री.पाटील म्हणाले. महाविकास आघाडीच्या सरकारने मात्र सत्तेत येताच जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला असून सर्व जातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय देण्याची भूमिका असल्याचे ते म्हणाले.



**माढा तालुक्यातून वाढता पाठिंबा...**

जयंत पाटील यांच्या सभेप्रसंगी माढा तालुक्यातील अनेक गावांमधील स्थानिक नेत्यांनी अभिजीत पाटील यांना जाहीर पाठिंबा दिला होता. आजही टेंभुर्णी येथे विधानसभा निवडणूकीच्या अनुषंघाने अमर पाटील यांच्या उपस्थितीत ऋषिकेश (बंटीनाना) बोबडे यांनी बैठक बोलावलेली होती. त्या बैठकीमध्ये सर्वांची मते जाणून घेऊन येत्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे उमेदवार अभिजीत (आबा) पाटील यांना सवार्नी एकमुखी पाठिंबा जाहीर केला. त्यावेळी माजी सरपंच प्रमोदजी कुटे, ऋषिकेश बंटीनाना बोबडे, डॉ.राहुल पाटील ,डॉ.सोमनाथ साळुंखे, संजय देशमुख, विनोद देशमुख, सचिन देशमुख,आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# खेडोपाड्यापर्यंत व वाड्यावर वस्त्यावर विकासाची गंगा पोहोचवली : आमदार समाधान आवताडे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आज पर्यंत मंगळवेढा तालुक्याला असंख्य आमदार खासदार झालेले आहेत परंतु या आमदार खासदारांनी आपल्या या मंगळवेढा शहराकडे व तालुक्याकडे पूर्णतः दुर्लक्ष केलेले असल्या मुळे आपल्या मंगळवेढा तालुक्यातील पाणी प्रश्न असो बेरोजगारी असो किंवा रस्त्याच्या बाबतीतले असलेल्या तक्रारी असो अशा असंख्य अडचणी व समस्या व तक्रारी यांचे निराकरण करण्याचे काम आज पर्यंत झालेल्या आमदार खासदारांनी केलेले नाही. या मागील झालेल्या आमदार खासदारांच्या कामाचा बॅकलॉग भरून काढण्याचे काम मी आज करीत आहे असे आज कचरेवाडी येथे भाजपाचे उमेदवार समाधान दादा अवताडे यांनी आज रोजी ग्रामस्थांच्या समोर प्रचार सभेमध्ये बोलताना ते म्हणाले.

यावेळी कचरेवाडी येथील असं की कार्यकर्ते व मान्यवर यांची उपस्थिती होती.

भाजपाचे उमेदवार समाधान दादा अवताडे यांनी आपल्या भाषणामध्ये पुढे बोलत असताना ते म्हणाले की गेल्या पोट निवडणुकीमध्ये पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील जनतेने मला भरघोस मताने निवडून दिले. त्यामुळे मला चार वर्षांमधील फक्त दोन वर्षे काम करण्यासाठी मिळालेले आहेत.दोन वर्षे ही कोरोनाच्या कालावधीमध्ये गेल्यामुळे मला काहीच कार्य करता आलेले नाही. मला मिळालेल्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये मी 3000 कोटी रुपयांचा निधी या पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील विविध विकास कामाच्या कामासाठी आणलेले आहेत.

या कचरेवाडी गावाकडे येणारा रस्ता हा पूर्वी अतिशय नादुरुस्त व खडबडीत होता. या रस्त्यासाठी आम्ही अडीच कोटीचा निधी मंजूर केला आणि त्याचे काम देखील पूर्णत्वास आणलेले आहे. असे समाधान अवताडे यांनी आपल्या प्रचार सभेतील भाषणामध्ये म्हणाले.

पूर्वी या मंगळवेढा तालुक्याचे आमदार बारीक सरीक गाव व वाड्यावस्ती त्यावरील लोकांना म्हणायचे की हा आपला कार्यकर्ता आहे का हा आपला मतदार आहे का अशी चौकशी करून मगच त्या गावाचा त्या वाडी वस्तीचा विकास केला जायचा परंतु ही पद्धत मी आमदार झाल्यापासून मोडीत काढलेली आहे.माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक वाडी वस्ती बारीक गाव असो त्या प्रत्येक गावातील रस्ते असो असंख्य अडचणी असो पाण्याचा प्रश्न असो काही असो या प्रश्नासाठी मी सातत्याने प्रयत्न केलेला आहे.आणि प्रत्येक गावातील लोकांना मी सांगितलेले आहे की तुम्ही ॲ फक्त माझ्याकडे काम घेऊन या आणि काम करून घ्या. मी कधीही मंगळवेढा किंवा पंढरपूर तालुक्यातील कुठल्याही गाव वाडी वस्ती या भागामध्ये विकास कामासाठी मी दुजाभाव केलेला नाही. मी फक्त विकास कामासाठी व सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठीच लोकप्रतिनिधी झालेला आहे. असे समाधान अवताडे यांनी आपल्या कचरेवाडी येथील प्रचार सभेमध्ये त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# पिंपरी दुमाला चे शिक्षक दांपत्याने जोपासली सामाजिक बांधिलकी

## मुलीच्या विवाहानिमित्त शाळा व मंदिर जीर्णोद्धारासाठी केली भरघोस आर्थिक मदत !

**शिरूर (कटूसत्य वृत्त):-** पिंपरी दुमाला ता.शिरूर येथील मूळ रहिवासी व सध्या पुणे मनपा मध्ये वडगाव शेरी येथे कार्यरत असलेले शिक्षक विलास चंदर दुर्गे व जि.प. शाळा चाकण रोड शिक्रापूर येथे सेवेत कार्यरत असलेल्या निता विलास दुर्गे या शिक्षक दांपत्याने आपल्या उच्चशिक्षित मुलीच्या विवाहानिमित्त अनावश्यक बाबींना टाळून गावातील जिल्हा परिषद शाळा व ग्रामदैवताच्या मंदिर जीर्णोद्धारासाठी भरघोस आर्थिक मदत केली आहे.



प्रतिकूल परिस्थितीमध्ये शिक्षण पूर्ण करून प्राथमिक शिक्षक पदावर रुजू झाल्यानंतर आपले गाव व आपली शाळा याविषयी संवेदनशील असलेले आदर्श शिक्षक विलास दुर्गे यांनी याप्रसंगी आपल्या भावना व्यक्त केल्या. ज्या शाळेने जीवन जगण्यासाठीचे संस्कार दिले व ज्या ग्रामदैवताच्या मंदिर परिसरामध्ये बालपण गेले,त्या दोन्ही संस्थांबाबत मदतीची भावना कायम मनामध्ये होती त्यामुळे पारंपारिक सन्मान सोहळे व इतर सर्व अनावश्यक बाबींना टाळून या ज्ञानमंदिर व ग्राम मंदिराच्या ऋणातून अल्प प्रमाणात ऋणमुक्त होण्यासाठीचा हा प्रयत्न आहे अशी भावना विलास दुर्गे यांनी व्यक्त केली . जिल्हा परिषद शाळा व सोमेश्वर मंदिर परिसर या दोन्ही ठिकाणी सध्या विकास कामे सुरू आहेत यासाठी दोन्ही संस्थांना मिळून एकूण 50 हजार रुपये मदत देण्यात आली आहे असे प्रगतशील शेतकरी व माजी उपसरपंच अशोक दुर्गे यांनी सांगितले.

देवस्थान ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष सुनील सोनवणे,खजिनदार शेखर पाटेकर व शाळेच्या वतीने मुख्याध्यापक राहुल चातुर यांनी हा निधी स्वीकारला.

दुर्गे परिवाराने केलेल्या या अनमोल मदतीबद्दल ग्रामपंचायत पिंपरी दुमाला चे सरपंच महेंद्र डोळस, उपसरपंच शरद खळदकर, सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट पदाधिकारी कैलास पिंगळे, अरुण कळसकर, अभिषेक शेळके, श्रीकांत सोनवणे, कैलास बडदे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शशिकांत चिखले, उपाध्यक्ष वषार्ताई विशाल खळदकर यांनी आभार व्यक्त केले आहे.

# अभिजीत पाटील यांची माढा मतदार संघात महिलांनी सुरू केला प्रचार



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** **माढा** विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अभिजीत पाटील यांच्या प्रचारात आता महिलांनी प्रचार यंत्रणा सुरू केली आहे. स्वतः पाटील यांची एक टीम, शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांची एक टीम तर आनंद पाटील, अमर पाटील यांची टीम आणि महिला वगार्ची एक टीम करून मतदार संघातील वेगवेगळ्या भागातील गावभेट दौऱ्यातून तीनही टीम विकासकामांसाठी मते मागताना दिसत आहेत. श्री.पाटील यांनी काल माढा तालुक्यातील बावी, भुताष्टे, विठ्ठलवाडी, लोंढेवाडी, चिंचोली, खैरेवाडी, महातपूर, राहुल नगर, निमगाव या गावांचा प्रचार दौरा केला. या सर्वच ठिकाणी त्यांना स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर सायंकाळी वडशिंगे व दारफळ येथे जाहीर सभा घेतल्या. यावेळी त्यांनी मागील तीस वर्षांपासून आमदारकी हातात असतानाही माढा विधानसभा मतदारसंघात रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण या मूलभूत सुविधांचीही पूर्तता झालेली नाही असे सांगून विकासकामांसाठी निवडून देण्याचे आवाहन केले.

याशिवाय साखर कारखानदारीचे राजकारण वेगळे आणि विधानसभेचे वेगळे असे सांगून त्यांनी विकासकामांचे विषय घेऊन निवडणुकीला सामोरे गेले पाहिजे असे ते म्हणाले.

दुसरीकडे सुमित्रा अभिजीत पाटील व रश्मी अमर पाटील यांनी गावोगावी महिला कार्यकर्त्यांना सोबत घेऊन देगाव, अजनसोंड, शेगाव, उंबरे, कान्हापुरी, देवडे, जळोली, खेडभोसे, उपळाई, माढा शहर, यांसह अनेक गावांमध्ये घरोघरी जाऊन प्रचार केला. त्यांचेही महिला वगार्तून उत्स्फूर्त स्वागत होत आहे. मुलींच्या आणि युवकांच्या उच्च शिक्षणाची सोय, महिलांच्या आरोग्यासाठी दवाखान्यांची सोय, रस्ते, बसस्थानक, यासाठी अभिजित पाटील यांना निवडून देण्याचे आवाहन महिलांना केले जात आहे.


# 10 व 11 नोव्हेंबर रोजी 248 शहर उत्तर विधानसभा मतदार संघातील मतदार सुविधा केंद्रावर टपाली मतदान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मा. भारत निवडणूक आयोगाचे सुचनांन्वये 248 सोलापूर शहर उत्तर विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 चे कामकाज सुरू असून विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठी निवडणूक कर्तव्यावर असणारे अधिकारी व कर्मचारी यांचे मतदार सुविधा केंद्रातील (Facilitation Center) मतदान दि. 10 नोव्हेंबर 2024 ते दि. 11 नोव्हेंबर 2024 या कालावधीत नार्थकोट प्रशाला सोलापूर येथे सकाळी 10 ते सायं 5 वा. पर्यंत होणार आहे. या करीता करमणूक शाखा, जुने जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथील स्ट्राँगरूम मधून सकाळी 9 वा. टपाली मतपत्रिका काढण्यात येतील व मतदाना नंतर परत स्ट्राँगरूम मध्ये ठेवण्यात येतील. तरी सदर टपाली मतत्रिका करमणूक शाखा, जुने जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथील स्ट्राँगरूम मधून काढते व ठेवते वेळी तसेच सुविधा केंद्रातील मतदान प्रक्रियेदरम्यान 248 सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघातील उमेदवार अथवा उमेदवाराकडून नियुक्त अधिकृत मतदान प्रतिनिधी यांनी नियुक्त पत्रासह करमणूक शाखा, जुने जिल्हाधिकारी कार्यालय व मतदान केंद्रावर येथे उपस्थित रहावे. अशी माहिती 248 सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघ, निवडणूक अधिकारी यांनी दिली.

# आक्षेपार्ह विधानाबाबत खासदार धनंजय महाडिक यांच्याविरोधात गुन्हा दाखल

**कोल्हापूर** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून आचारसंहिता १५ ऑक्टोबर, २०२४ पासून लागू झाली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महात्मा फुले युवक मंडळ फुलेवाडी पाचवा स्टॉप फुलेवाडी ता. करवीर येथील राजकीय प्रचाराच्या जाहीर सभेत खासदार धनंजय महाडिक यांनी केलेल्या भाषणात भारतीय न्यायसंहिता - २०२३ चे कलम १७९ अन्वये आदर्श आचारसंहितेचे उल्लघंन केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे याबाबतचा खुलासा तात्काळ सादर करण्यात यावा अशी नोटीस त्याच दिवशी निवडणूक निर्णय अधिकारी कोल्हापूर दक्षिण यांनी धनंजय महडिक यांना देण्यात आली होती. याबाबत धनंजय महडिक यांनी खुलासा सादर केला. याबाबत सादर केलेला खुलासा अमान्य करीत खासदार श्री. महडिक यांच्यावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी भरारी पथकातील संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यानुसार भारतीय न्याय संहिता बी एन एन एस २०२३ अंतर्गत १७१ (२) (a) अंतर्गत दि. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.२३ वा जुना राजवाडा कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# कटूसत्य शब्दकोडे क्र. १०६



**उभे शब्द :** १) राधाकृष्ण विखे-पाटील यांचा माजी खासदार असलेला मुलगा
२) पाऊस (इंग्रजीत)
३) संशय (हिंदीत) ४) लहान बाळाचे पाळण्यात नाव ठेवणे, बारसे ५) घाण, ** कचरा ६) बाजारात मिळणारे एक तयार गोड सरबत ७) उंचावरून पडणारा पाण्याचा प्रवाह ८) उलटी, ओकारी
११) शपथ (हिंदीत) १४) ऐकण्याचे इंद्रिय १७) पत्र १९) मुलीचा पती
२०) बदक (इंग्रजीत), कड उलट लिहा
२१) रात्र (इंग्रजीत) २३) नरक
२४) एक हजार कि.ग्रॅ. म्हणजे एक **
२५) कुत्र्याचा जोडीदार
२६) विक्षिप्त असे वर्तन करणारा
२७) पावसापासून संरक्षणासाठी ही वापरतात ३०) वरल्या मनाने, वरवर
३२) भव्य मोठे, सांगलीतील काँग्रेसचे लोकसभा खासदार -*** पाटील
३८) पातळ कालवण
३९) फेब्रुवारी (हिंदीत) ४०) टाकाऊ कागद ४१) दुर्ग, किल्ला
४२) सनरायझर्स हैद्राबाद टीममधील फिरकी गोलंदाज-*** खान
४४) अकरा (इंग्रजीत)
४५) क्रिकेटमधील चौकार (इंग्रजीत)

**आडवे शब्द :** १) एक भारतीय निवृत्त डावखुरा फलंदाज
५) चेन्नई सुपर किंग्ज टीममधून खेळलेला एक अष्टपैलू माजी महाराष्ट्रीयन खेळाडू
९) सीतेचे वडील-राजा *** १०) एक रास १२) बाँब (हिंदीत)
१३) पौष्टीक, कसयुक्त १४) अक्षराच्या मागे येणारी उभी रेष १५) पैसा, संपत्ती
१६) भारतीय फलंदाज-*** कोहली
१८) मुस्लिम बांधवांचा पवित्र सण किंवा पवित्र महिना २०) जेवणाचा टिफिन (मराठीत) २१) श्वसनेंद्रिय २२) विमान चालविणारा २५) छ. संभाजी महाराजांच्या आईचे नाव २८) खेळाडूंचा संघ (इंग्रजीत) २९) आश्चर्य ३१) वडाच्या झाडाचे स्त्रिया पूजन करतात तो सण ३३) सल उलट लिहा ३४) याच्यापासून शिरा बनवितात
३५) दहा (हिंदीत) ३६) हात, वस्तूवरील टॅक्स (मराठीत)
३७) भुईमुगाच्या शेंगेचे किंवा फळावरील आवरण ४०) धावणे (इंग्रजीत)
४१) फळातील गाभा ४३) कथेचा मूळ आशय, रसा उलट लिहा
४५) कालवण किंवा इतर पदार्थ बनविताना तेलात सर्व मसाला भाजून घेण्याची क्रिया ४६) एक म्हण-होता जिवा म्हणून वाचला ** ४७) लाकडाचे गोदाम
४८) राष्ट्रवादीचे सुप्रिमो-*** पवार ४९) मुस्लिम बांधवाचा एक सण
५०) माफी मागणे (इंग्रजीत)

**शब्दकोडे क्र. १०५ चे उत्तर**



## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**यात्रा**
उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर, श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर, काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर
**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
**९४२२४६०३१९**

**विकणे आहे**
सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:** 9881361260

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**
**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**
**संपर्क:**
**गणेश स्टील फॅब्रिकेशन**
**९९२२५२५२३७**







**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# भ्रष्ट मार्गाने आलेले सरकार घालवा

## राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे आवाहन




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ५० खोके आणि एकदम ओके म्हणत भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून आलेले सरकार घालवा आणि राज्याच्या विकासासाठी महाविकास आघाडीकडे सत्ता सोपवा, असे आवाहन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले.सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार, माजी महापौर महेश कोठे यांच्या प्रचारार्थ तुळजापूर वेस येथे झालेल्या जाहीर सभेत पाटील बोलत होते. प्रारंभी कोठे यांच्या संपर्क कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले.यावेळी खासदार धैर्यशील मोहिते-पाटील,निरीक्षक शेखर माने, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल,उमेदवार महेश कोठे, काँग्रेसचे नेते महादेव चाकोते, माजी महापौर मनोहर सपाटे, ॲड.न्यू. एन. बेरिया, नलिनी चंदेले, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, सिध्दाराम चाकोते, बिज्जू प्रधाने,विद्या लोलगे, लता फुटाणे,-सुनीता रोटे, अक्षय वाकसे आदी उपस्थित होते. राज्यातील महायुती सरकारच्या कारभाराचे वाभाडे काढत पाटील यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीकास्त्र सोडले. महाराष्ट्रातील मोठमोठे उद्योग गुजरातला पळवून नेत असतानाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस व अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी विरोध दर्शविला नाही. या उद्योगांच्या बदल्यात महाराष्ट्राला दुसरा मोठा प्रकल्प देण्याची हमी मोदींनी दिली होती; परंतु मोदींनी महाराष्ट्राला भोपळा देत मराठी माणसाची निराशा केली आहे. विकासात महाराष्ट्र संपूर्ण देशात कायम दुसऱ्या तिसऱ्या स्थानी राहिला आहे. परंतु २०१६ पासून महाराष्ट्राची पिछाडी होत गेली असून आज महाराष्ट्र सातव्या स्थानी गेला आहे. महाराष्ट्राच्या या अधोगतीला महायुतीचे सरकारच जबाबदार असल्याचा आरोप पाटील यांनी केला. यावेळी खासदार मोहिते-पाटील यांनीही महाविकास आघाडीला विजयी करण्याचे आवाहन केले.

# महाविकास आघाडीला धडा शिकवा



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** पक्ष, चिन्ह चोरले म्हणणाऱ्यांनीच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे त्यांचा विचार विकला,असा घणाघात करत महायुतीच्या काळात आम्ही लाडकी बहीण योजना आणली,मात्र न्यायालयात जाऊन याला खोडा घालण्याचे काम महाविकास-आघाडीने केले. या निवडणुकीत त्यांना धडा शिकवा व पुन्हा एकदा तुमच्या हक्काच्या महायुतीला संधी द्या, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांनी केले.बार्शीत महायुतीचे उमेदवार राजेंद्र राऊत यांच्या प्रचारार्थ भगवंत मैदानावर झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते.व्यासपीठावर महायुतीचे उमेदवार राजेंद्र राऊत तसेच प्रा. शिवाजी सावंत, अमोल शिंदे, केदार सावंत, दिलीप कोल्हे, माजी नगराध्यक्ष ॲड. असिफ तांबोळी, रमेश पाटील, माजी नगरसेवक विजय राऊत तसेच पद्मजा काळे, ॲड. राजश्री डमरे आदी उपस्थित होते. सरकारच्या तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा आहे.लाडकी बहीण योजना पुढेही चालूच ठेवणार असून त्यात आणखी वाढ करण्याचा निर्णय महायुतीने घेतला असल्याचे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मला एक सख्खी बहीण होती, आता अडीच कोटी सख्ख्या बहिणी झाल्याचा उल्लेख त्यांनी अभिमानाने केला. देशात मोदी सरकार आल्यानंतर संविधान दिन व्यापक स्वरूपात साजरा करण्यास सुरुवात केली. चंद्र,सूर्य असेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान असेल.बार्शीत महायुतीचे उमेदवार राऊत यांच्या विरोधात उभे असलेले महाविकास आघाडीचे उमेदवार ॲड. दिलीप सोपल यांच्यावरही मुख्यमंत्री शिंदे यांनी जोरदार टीकास्त्र सोडले. यावेळी बार्शी शहर व तालुक्याच्या विकासासाठी राऊत यांनी केलेल्या मागण्या मान्य करण्याचा शब्द बार्शीकर जनतेला त्यांनी दिला. या निवडणुकीत महायुतीचे उमेदवार राऊत हे आता विजयी झाल्याचीच आजची गर्दी सांगत असल्याचे शिंदे म्हणाले.

बार्शीकर राऊत यांना निवडून देतील, येत्या २३ तारखेला आपण स्वतः पुन्हा एकदा विजयी गुलालासाठी बार्शीत येऊ असेही ते म्हणाले. यावेळी उमेदवार राजेंद्र राऊत म्हणाले, महायुतीचे सरकार आल्यापासून बार्शीकरांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आणि चार हजार कोटी रुपयांचा निधी बार्शीसाठी सरकारने दिला. वैराग तालुक्यास बार्शी उपसा सिंचन योजना, साठवण तलाव, भगवंत तीर्थक्षेत्र, शेतीसाठी पाणी अशा इतर आणखी मागण्या राऊत यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासमोर ठेवल्या. यावेळी भगवंत मैदान गर्दीने गच्च भरले होते.सूत्रसंचालन केशव घोगरे, संदीप अलाट यांनी केले तर विजय राऊत यांनी आभार मानले.

# दक्षिण मध्ये मनसेचे उमेदवार महादेव कोगनुरे यांचा झंझावात दौरा



**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-** शनिवार दि 9 नोव्हेंबर 2024 रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांचा आज दक्षिण सोलापूर मध्ये झंजावात दौरा पहायला मिळाला. आज नांदणी, औज मंद्रूप, बरुर, कारकल, हत्तरसंग, लंवगी, चींचपुर, सादेपुर, टाकळी, बाळगी,कुरघोट, आनंद नगर आदी गावातून महादेव कोगनुरे यांचा दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद पहायला मिळाला. या गावभेट दौऱ्यात युवक, महिला, वयोवृद्ध नागरिक, शेतकरी, शेतमजूर , व्यापारी ,नोकरदार वर्ग महादेव कोगनुरे यांना प्रतिसाद देताना दिसून आले.सर्व सामान्य माणूस महादेव कोगनुरे यांना विधानसभेत पाठवण्यासाठी धडपड करताना मतदारसंघात पहायला मिळाले. सर्व सामान्य माणसांच्या सुख दु:खात सहभागी होणारा महादेव यांना सर्व सामान्य माणसांच्या हृदयात स्थान मिळाल्याने ते नक्कीच निवडून येणार असल्याचे नागरिकांतून बोलले जात होते.प्रत्येक गावोगावी महादेवाचा जल्लोषात स्वागत करीत फटाक्यांचे आतषबाजी करीत सामान्य नागरिक महादेवाशी चर्चा करताना दिसून आले. प्रचंड प्रतिसाद पाहून महादेव कोगनुरे ही भारावून गेले होते.यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे व एम के फाऊंडेशन चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अभिजित पाटील यांच्या सभेत झालेल्या बबनदादांच्या अपमानाचा समर्थकांकडून तीव्र निषेध

## जयंत पाटील यांना सुद्धा विचारला जाब टेंभुर्णी पोलीस स्टेशनला दिले निवेदन



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीचा प्रचार मध्यावर आला असता प्रचाराने वेगळे वळण घेतल्याचे दिसून येते उपळाई येथे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे उपस्थितीमध्ये झालेल्या सभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट या पक्षाचे उमेदवार अभिजीत पाटील व इतर व व त्यांनी माढा तालुक्याचे आमदार बबनदादा शिंदे यांचे वर टीका करीत असताना अत्यंत खालच्या दर्जाच्या भाषेचा उपयोग केला बबनदादा शिंदे यासारख्या जेष्ठ नेत्याला शिवराळ भाषा वापरणे एकेरी उल्लेख करणे याबाबत माढा विधानसभा संघामध्ये बबनदादा दादा शिंदे यांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता पसरली असून आमदार बबनदादा समर्थकांनी लोकशाही पद्धतीने टेंभुर्णी पोलीस स्टेशनला पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना निवेदन देऊन सदर विधानांचा निषेध व्यक्त करण्यात आला.

शनिवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान निवेदन टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांना दिले असून दिलेली निवेदन हे वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पोच करून माढा पोलीस स्टेशनच्या हद्दीत सभा येत असल्याने त्या ठिकाणीही पाठविले जाईल व कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून याबाबतचे वरिष्ठ अधिकारी या वर निर्णय घेतील याची मला खात्री असल्याचे पोलिस निरीक्षक दीपक पाटील यांनी बोलताना सांगितले. यावेळी आमदार बबनदादा शिंदे समर्थक रमेश पाटील, जि.प. प्रतिनिधी शिवाजीराव पाटील, संचालक विष्णुपंत हुंबे, बेंबळे गाव चे नेते दिलीपराव भोसले, टेंभुर्णी चे माजी सरपंच आण्णा देवकर, रामभाऊ शिंदे, कल्याण अनपट सर, ग्रामपंचायत सदस्य परमेश्वर खरात सचिन होदाडे, उंबरे गावचे सचिन पवार अधिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने समर्थक उपस्थित होते.

# भगीरथ भालकेंना मोठा धक्का: शहराध्यक्षासह काँग्रेसच्या अनेक बड्या पदाधिकाऱ्यांचा अनिल सावंतांना पाठिंबा



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** मंगळवेढ्यात काँग्रेसमध्ये फूट; भगीरथ भालकेंवर नाराज होत काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांचा अनिल सावंतांना पाठिंबा..

पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात यंदा चौरंगी लढत पाहायला मिळणार आहे. भाजपकडून समाधान आवताडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून अनिल सावंत, काँगेस कडून भगीरथ भालके रिंगणात आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांनी आपापले उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. काँग्रेसने घेतलेल्या या निर्णयामुळे तालुक्यातील काँग्रेसचे पदाधिकारी नाराज झाले आहेत. काँग्रेसआयच्या पदाधिकाऱ्यांनी नाराज होऊन, आज पत्रकार परिषद घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. आज शनिवार दिनांक 9 नोव्हेंबरला विठ्ठल इन कार्यालय, स्टेशन रोड, पंढरपूर या ठिकाणी पत्रकार परिषद घेऊन हा निर्णय घेतला गेला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अनिल सावंत यांनी पंढरपूर शहराध्यक्ष अमर सूर्यवंशी आणि पाठिंबा देणाऱ्या काँग्रेसच्या विविध पदाधिकाऱ्यांचे कार्यकर्त्यांचे आभार मानले.

माध्यमांशी बोलताना अनिल सावंत म्हणाले, पंढरपूर मंगळवेढा हा राष्ट्रवादीचा पारंपारिक मतदारसंघ आहे. काल जयंत पाटील यांनी देखील अनिल सावंत हेच महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार असल्याचे स्पष्ट केलं आहे. या मतदारसंघात कोणाची किती ताकद आहे, हा प्रश्न नाही. आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्रित लढून ही जागा निश्चितपणे जिंकणार आहोत.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ज - डॉ. अर्जुन भोसले



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** कार्तिक शुद्ध एकादशी 12 नोव्हेंबर 2024 रोजी असून, या कार्तिकी यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिली.

कार्तिक वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी 1 हजार 625 पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये एक पोलीस अधिक्षक, एक अप्पर पोलीस अधिक्षक, 10 पोलीस उपअधिक्षक, 23 पोलीस निरिक्षिक, 90 सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, 1 हजार पोलीस कर्मचारी व 500 होमगार्ड तसेच 01 एसआरपीएफ कंपनी, दोन बीडीएस पथके नियुक्त करण्यात आले आहेत.

वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, 65 एकर, महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी 10 वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉडची स्थापन करण्यात आले असून यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच 150 सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी सावरकर चौक, शिवाजी चौक, चंद्रभागा वाळवंट तसेच अंबाबाई पटांगण येथे तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारकरी भाविकांना आवश्यक सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली.

वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या आदेशान्वये जड वाहतुक शहराबाहेरुन वळविण्यात आली आहे.

तसेच वाहतुक नियमनासाठी 13 ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर 16 ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांनी केले आहे.

# राष्ट्रीय रायफलमध्ये त्वरिता खटकेने पटकाविले सुवर्णपदक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केरळ येथे थिरूवनंतपुरम (त्रिवेंद्रम) मध्ये झालेल्या जी.व्ही. मालवणकर अखिल भारतीय राष्ट्रीय रायफल शूटिंग चॅम्पियनशिप २०२४ या स्पधेर्तील ज्युनिअर वुमन्समध्ये सुकन्या त्वरिता सूर्यकांत खटके हिने सुवर्णपदक पटकावीत वन प्लस वन सिल्व्हर आणि गोल्डपदक मिळविले. त्वरिता ही केरळ येथे २४ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत झालेल्या राष्ट्रीय रायफल्स चॅम्पियनशिपसाठी एनसीसी नॅशनल कॅम्पसाठी गेली होती. दरम्यान, सोलापूरच्या त्वरिता हिने पहिल्यांदाच एनसीसी डायरेक्टमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व तमिळनाडू येथे केले. केरळ येथे थिरूवनंतपुरम (त्रिवेंद्रम) मध्ये झालेल्या जी. व्ही. मालवणकर स्पर्धेत त्वरिता हिने सहभाग घेतला होता. ज्युनिअर ऑल इंडिया गोल्ड व सिल्व्हरवर आपले नाव कोरून त्वरिताने एक इतिहास रचला आहे. त्वरिता हिने यापूवीर्ही अनेक स्पर्धात यश मिळवून सोलापूरचे नाव उंचाविले होते. जिल्हास्तरीय, विभागीय व राज्यस्तरावर तिने अनेक पदके मिळविली आहेत.

त्वरिताच्या यशाबद्दल प्रशिक्षक अंजली भागवत, सहायक प्रशिक्षक रश्मी, आई नीलम, वडील सूर्यकांत खटके, जुळे सोलापूर मधील फ्लोरा कासा सोसायटीचे चेअरमन सचिन जाधव, माजी चेअरमन आदिनाथ चव्हाण, यांनी कौतुक केले आहे.

# भाविकांच्या सुविधेसाठी पाच आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना - प्रांताधिकारी सचिन इथापे



**पंढरपूर(कटूसत्य वृत्त):-** कार्तिकी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. या यात्रेत येणाऱ्या भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी प्रशासनाने आवश्यकती तयारी केली असून, यात्रेत भाविकांच्या सोयी, सुविधा, स्वच्छता तसेच सुरक्षितेला प्राधान्य देण्यात आले आहे. यात्रा कालावधीत भाविकांच्या सुविधेसाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष 24 तास कार्यरत राहणार आहे. भाविकांना काही अडचणी आल्यास आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपर्क साधावा असे आवहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

कार्तिक वारीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा तात्काळ मिळाव्यात त्याचबरोबर आरोग्याच्या व सुरक्षितेतच्या दृष्टीने कोणतेही गैरसोय होऊ नये यासाठी पत्राशेड, 65 एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर, नगरपालिका तसेच मुख्य आपत्कालीन मदत व प्रतिसाद केंद्र तहसिल कार्यालय, पंढरपूर येथे कार्यान्वित करण्यात आले आहे.

आरोग्य विभागामार्फत यासाठी पत्राशेड, 65 एकर, चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल-रुक्मिणी मंदीर येथे प्रथमोपचार केंद्र उभारण्यात आली आहेत. तसेच या ठिकाणी मुबलक प्रमाणात औषधसाठा उपलब्ध करण्यात आला आहे. सर्व सुविधायुक्त रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आली आहे. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून दर्शन रांग] पत्राशेड, चंद्रभागा वाळवंट, 65 एकर व मंदीर परिसर येथे वेळोवेळी स्वच्छता करण्यात येत आहे.

# काँग्रेसचे नगरसेवक लखन चौगुले व त्यांच्या कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये केला प्रवेश



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगरपालिकेचे काँग्रेसचे नगरसेवक लखन चौगुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी आज रोजी भाजपा या पक्षामध्ये प्रवेश केला आहे. यावेळी नगरसेवक लखन चौगुले यांच्यासोबत रामा चौगुले दीपक चौगुले यांचा आमदार समाधान दादा अवताडे व अँड डिसलरीज चे चेअरमन उद्योजक यांच्या उपस्थितीमध्ये केलेला आहे. नुकतेच दोन दिवसा खाली पांडुरंग परिवार चे प्रमुख प्रशांतराव परिचारक व उमेश राव परिचारक पंढरपूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष उज्वला भालेराव व नगरसेवक महादेव धोत्रे यांनी भाजपमध्ये प्रवेश केलेला आहे. या दोघांच्या भाजपा प्रवेशानंतर पंढरपूर शहरामध्ये भाजपा या पक्षामध्ये प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे व आमदार समाधान दादा अवताडे यांना पुन्हा एकदा आमदार करण्याच्या उद्देशाने हे सर्व मान्यवर नगराध्यक्ष व नगरसेवक हे भाजपामध्ये प्रवेश करीत आहेत.

भाजपाचे आमदार समाधान दादा अवताडे यांनी आपल्या अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी केलेले विकास कामे पाहून व सर्वसामान्य जनतेला सामावून घेणे चे व त्यांचे कामे करण्याची कार्यपद्धती पाहून अनेक जण भाजपामध्ये प्रवेश करून समाधान अवताडे यांना होणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये समाधान आवताडे यांना विजयी करण्यासाठी या सर्वांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे. असे प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी सांगितले.

# शहरात मांस, मटण विक्रीस मनाई

**पंढरपूर(कटूसत्य वृत्त):-** कार्तिकी शुध्द एकादशी 12 नोव्हेंबर 2024 रोजी असून, कार्तिकी यात्रा कालावधी दि. 02 ते 15 नोव्हेंबर आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या वारी कालावधीमध्ये दिनांक 11 ते 13 नोव्हेंबर 2024 या कालावधीत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपविभागीय दंडाधिकारी श्री.इथापे यांनी दिनांक 11 ते 13 नोव्हेंबर 2024 या कालावधीत शहरात मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल यावर बंदी घालण्यात आली आहे.

# दक्षिण सोलापूरच्या विकासासाठी कटिबद्ध - महादेव कोगनुरे

## गावभेट दौऱ्यादरम्यान मनसेला प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे. माझा प्रत्येक क्षण हा सामान्य नागरिकांच्या सेवेसाठी बांधील असेल असे मी तुम्हाला वचन देतो, असे सांगत रेल्वे इंजिन या चिन्हा समोरील बटन दाबून मला एक संधी द्या असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांनी केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार महादेव कोगनुरे यांचे झंझावती गावभेट दौरे सुरू आहेत. प्रत्येक गावात कोगनुरे यांचे पुष्पगुच्छ देऊन फटाक्यांच्या जोरदार आतषबाजीत जल्लोषात स्वागत होत आहे. कुठलेही पद नसताना राजकीय पार्श्वभूमी नसताना महादेव कोगनुरे यांनी केलेल्या समाजकायार्चे कौतुक होत आहे. यंदा माझे मत महादेव कोगनुरे यांनाच देणार अशी प्रतिक्रिया प्रत्येक मतदार व्यक्त करत आहे.

रविवारी (ता. १०) महादेव कोगनुरे व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या ताफ्याने बोरुळ, कणबस, शिरवळ, इंगळगी, हिपळे, सावतखेड, वांगी, मनगोळी, गावडेवाडी, गुंजेगाव, कंदलगाव, अकोले आदी गावात दौरे केले.

गावभेट दौऱ्यादरम्यान महादेव कोगनुरे म्हणाले की आपल्याला नवनिर्माण करायचे असेल तर प्रस्थापित राजकारण्यांना धक्का देऊन माझ्यासारख्या प्रामाणिक आणि जनसेवेची इच्छा असणाऱ्या कार्यकर्त्यार्ला तुम्ही एक संधी द्या. आतापर्यंत तुमचा अपेक्षाभंग झाला आहे.

मला निवडून दिल्यानंतर तुम्हाला अभिमान वाटेल असेच कार्य माज्या हातून होईल याची खात्री देतो.

ज्येष्ठ नागरिकांचे कोगनुरे यांना आशीर्वाद महादेव कोगनुरे यांचे जोरदार होणारे गाव भेटदौरे आता विरोधकांच्या तोंडचे पाणी पळवत आहेत.

दौऱ्याला होणारी तरुणाईची गर्दी आणि सर्वसामान्य नागरिकांचा वाढता प्रतिसाद मतदारसंघातून कोगनुरे हेच विजयी होणार हे दर्शवत आहे. ज्येष्ठ महिला आणि नागरिक ही कोगनुरे यांचे तोंड भरून कौतुक करत आशीर्वाद देत आहेत.